



डॉ. सुनंदा व सुभाष रानडे फाउंडेशन तर्फे पारितोषिक प्राप्त लेख

# औषधी कल्पांच्या फलश्रुतींचे अध्ययन

## लोहासवम् (भाग ३)

वैद्य अभय कुलकर्णी,एम्.डी.

वैद्य राजश्री कुलकर्णी,एम्.डी.

**लोहासवममुं मर्त्यः पिबेद्वह्निकरं परम् । पाण्डुश्वयथु गुल्मानि जठराण्यर्शसां रुजम् ।।**
**कुष्ठं प्लीहामयं कण्डूं कासं श्वासं भगन्दरम् । अरोचकं च ग्रहणीं हृद्रोगं च विनाशयेत् ।।**

लोहासवाचा मुख्य अधिकार असलेल्या पाण्डु रोगामधील लोहासवाचे कार्य व अग्निवृध्दिकर कार्य या संबंधी विस्तृत माहिती मागील दोन भागांमध्ये बघितल्यानंतर ह्या भागात आपण लोहासवाच्या फलश्रुतीतील इतर व्याधींमध्ये ते कसे काम करते हे बघणार आहोत.

औषधांच्या फलश्रुतीच्या अध्ययनाच्या निमित्ताने एक गोष्ट लक्षात आली ती अशी की लोहासवाचा व नवायस लोहाचा पाठ अगदी सारखा आहे, दोन्ही कल्पांमध्ये एकसारखीच घटक द्रव्ये आहेत, फक्त या दोन्ही कल्पांत लोहाच्या प्रमाणात फरक आहे नवायस लोहात सर्वांच्या समभाग (सर्व नऊ द्रव्ये एक एक भाग व लोह नऊ भाग म्हणूनच त्याचे नाव नव-अयस असे आहे.) तर लोहासवात लोहासह सर्व द्रव्ये चार - चार पल आहेत. तसेच नवायस हे चूर्ण स्वरुपात आहे तर लोहासव हे द्रव स्वरुपात. आपण खरं तर फलश्रुतीच्या अभ्यासात घटक द्रव्यांचा व त्यांच्या गुणधर्मांचा विचार करणे टाळले आहे कारण तो एक स्वतंत्रपणे अभ्यासण्याचा विस्तृत विषय आहे आणि फलश्रुतींमधल्या व्याधींच्या वर्णनामागची संगती अभ्यासणे हा आपला ह्या मालिकेचा मुख्य उद्देशआहे. पण जे अत्यंत ठळकपणे जाणवते ते निरीक्षण समोर ठेवायलाच हवे. ह्या दोन कल्पांमधील साधर्म्य हे त्यापैकीच एक निरीक्षण. हे साम्य केवळ घटक द्रव्यांपुरतेच मर्यादित नाही तर फलश्रुतीतल्या रोग समूहाच्या यादी बाबत पण आहे असे दिसते. लोहासव व नवायस लोह ह्या दोन्ही कल्पांची घटक द्रव्येही सारखी आहेत, फलश्रुतीतली रोगांची यादी ही साधारण सारखीच आहे व रोगाधिकार ही एकच आहे. ह्याचा अर्थ ह्या दोन्ही कल्पांमधील घटक द्रव्यांचा समूह हा ह्या रोग समूहावर कार्यकारी आहे असे स्पष्ट होते.

लोहासव हे उत्तम अग्निदिप्तीकर असून पाण्डु, शोथ, गुल्म, उदर व प्लीहोदर, अर्श, कुष्ठ, कण्डू, कास, श्वास, भगंदर, अरोचक, ग्रहणी व हृद्रोग ह्या व्याधी/अवस्था व लक्षणे ह्यावर कार्यकारी ठरते असे वर्णन फलश्रुतीमध्ये आहे . गंमत अशी आहे की वरील ज्या लक्षण समुहांवर लोहासव कार्यकारी ठरते, याच घटक द्रव्यांचा चूर्ण स्वरुपातला कल्प ज्यास नवायस लोह म्हणतात तो कल्प, चरकाचार्यांच्या मते **भक्षयेत्पाण्डुहृद्रोगकुष्ठार्शःकामलापहम् ।** म्हणजे ह्याचे सेवन केले असता पाण्डु, हृद्रोग, कुष्ठ, अर्श व कामला हे विकार नष्ट करते, ह्याच नवायसाचे वर्णन सुश्रुताचार्यांनी प्रमेह पिडका ह्या अधिकारात केले आहे. प्रमेह पिडका चिकित्सेत बरोबरच शोथ चिकित्से मध्ये ही वर्णन केले आहे. सुश्रुताचार्यांच्या नुसार नवायसाचे गुणधर्मांचे वेगळ्याच दृष्टीकोनातून वर्णन केले आहे.

**एतेन जाठर्यं न भवति, सन्नोऽग्निराप्यायते, दुर्नामशोफ पाण्डुकुष्ठरोगाविपाककासश्वासप्रमेहाश्च न भवन्ति।** असे वर्णन आहे. म्हणजे ह्या मुळे स्थूलता निर्माण होत नाही, मंद झालेला अग्नि प्रदीप्त होतो, अर्श, शोथ, पाण्डु, कुष्ठ, अविपाक, कास, श्वास व प्रमेह होत नाहीत असे वर्णन आहे. एकाच औषधाचे दोन आचार्यांनी वेगवेगळे गुणधर्म वर्णन केले आहेत. ते एकत्र केले तर लोहासवाच्या फलश्रुतीमध्ये वर्णन केलेले बहुतांश रोग समाविष्ट होतात.

जे लोहासवाच्या फलश्रुतीत या व्यतिरिक्त वर्णन केलेले व्याधी आहेत ते उदर, प्लीहोदर, भगंदर, अरोचक, ग्रहणी व गुल्म हे आहेत, याचा अर्थ ह्याच घटक द्रव्यांचा आसव ह्या स्वरुपातला व लोहाच्या वेगळ्या प्रमाणातला कल्प बनविला तर त्याचे कार्य अधिक व्यापक होते. औषधाचे आणखी वेगळे स्वरुप म्हणजे घृत अधिकार आणि नवायस लोह व लोहासवातल्या घटक द्रव्यांमध्ये थोडा बदल म्हणजे त्रिकटु, त्रिफळा, चित्रक, विडंग, हे समान घटक व लोह वगळून चव्य, धान्यक हे दोन वेगळे घटक असलेला त्र्युषणादि घृत नावाचा योग चरकाचार्यांनी गुल्म चिकित्सेत वर्णन केलेला आहे. नवायसाच्या चरक, सुश्रुत ह्या दोन्हीही ग्रंथातल्या पाठांच्या फलश्रुतीत गुल्माचा उल्लेख नाही मात्र आसव स्वरुपातल्या लोहासवात व घृत स्वरुपातल्या कल्पात गुल्माचा उल्लेख आहे. पण लोहासवाच्या फलश्रुतीत कामला व प्रमेह, स्थौल्य यांचा

**लोहासव हा वैद्यांच्या नित्य वापरातील कल्प आहे.**

उल्लेख नाही. ह्याचा अर्थ चूर्ण स्वरुपातल्या घटकांचा संयोग गुल्मांत काम करत नाही व आसव स्वरुपातला द्रव्य संयोग प्रमेह व स्थौल्य यात काम करत नसावा. हे सर्व विस्तृतपणे सांगण्याचा उद्देश असा की लोहासवाच्या फलश्रुतीमधल्या रोग समूहाच्या यादीत पाण्डु, शोथ, गुल्म, उदर व प्लीहोदर, अर्श, कुष्ठ, कण्डू, कास, श्वास, भगंदर, अरोचक, ग्रहणी व हृद्रोग ह्याच रोगांचा समावेश करण्यामागे घटक द्रव्यांचा विशिष्ट संयोग हे एक महत्त्वाचे कारण आहे. त्रिकटु, त्रिफळा, त्रिमद (चित्रक, विडंग व मुस्ता) व लोह हा द्रव्य समूह असला की या रोगांवर काम घडते हा बोध आपल्याला या अभ्यासातून मिळतो. म्हणून प्रत्येक कल्पांतल्या प्रत्येक घटकाचे स्वतंत्र महत्त्व व विशिष्ट कार्य आहे तसेच विशेष म्हणजे कोणत्या स्वरुपात हा द्रव्यसंयोग दिला जातो त्यानुसारही त्याचे कसे कार्य घडते हे ठरते, जसे की नवायसामध्ये चूर्ण स्वरुपात स्थूलता हे विशेष कार्य, लोहासवात आसव स्वरुपांत भगंदर, ग्रहणी, उदर इ. विशेष कार्य व त्र्युषणादि घृत मध्ये घृत स्वरुपात गुल्मावर कार्य होते त्यामुळे औषध कल्पात प्रत्येक घटक आहे हे बघणे व त्या त्या व्याधी किंवा अवस्थांमध्ये त्याच स्वरुपातला कल्प वापरावा हे अपेक्षित आहे हे लक्षात घ्यायला हवे.

खालील तक्त्यामध्ये लोहासव व नवायसाच्या फलश्रुतीतील रोगांची यादी दिलेली आहे व वेगळे व्याधी अधोरेखित केलेले आहेत या वरुन एकच द्रव्य समूहाचे वेगवेगळ्या स्वरुपात कोणत्या व्याधींवर विशेषत्वाने काम होते ते चटकन लक्षात येते.

| अनु. क्र | लोहासव | नवायस लोह(चरक व सुश्रुत) |
|---|---|---|
| १ | पाण्डु | पाण्डु |
| २ | हृद्रोग | हृद्रोग |
| ३ | कुष्ठ | कुष्ठ |
| ४ | अर्श | अर्श |
| ५ | शोथ | शोथ |
| ६ | श्वास | श्वास |
| ७ | कास | कास |
| ८ | अग्निमांद्य | अग्निमांद्य |
| ९ | अरोचक | अविपाक |
| १० | गुल्म | प्रमेह |
| ११ | उदर व प्लीहोदर | जाठर्य |
| १२ | भगंदर | कामला |
| १३ | ग्रहणी | |
| १४ | कण्डु | |

लोहासवाच्या फलश्रुतीत पाण्डु नंतर जर कोणत्या व्याधीचे वर्णन असेल तर ते शोथ ह्या व्याधीचे आहे. रस-रक्तसंवहन हे लोहासवाचे कार्यक्षेत्र आहे हे आपण मागच्या भागात बघितले, शोथ हा रस-रक्तसंवहनातील विकृतीचा आजार आहे असे त्या व्याधीच्या संप्राप्तीच्या वर्णनावरुन लक्षात येते.

**बाह्याः सिराः प्राप्य यदा कफासृक्पित्तानि सन्दूषयतीह वायुः।**
**तैर्बद्धमार्गः स तदा विसर्पन्नुत्सेध लिङ्गं श्वयथुं करोति।।८।।**

च.चि १२

**पित्तरक्तकफान्वायुः दुष्टो दुष्टान् बहिःसिराः ।**
**नीत्वा रुध्दगतिस्तैर्हि कुर्यात्त्वङ्मांससंश्रयम् ।।**
**उत्सेधं संहतं शोफं तमाहुर्निचयादतः । सर्वं...।।**

अ.हृ. नि. १३/२१

ह्या संप्राप्ती नुसार दुष्ट पित्त, कफ व रक्त ह्यांना बाह्य सिरांमध्ये नेऊन त्यांच्याकडूनच गति अवरुध्द झाल्यामुळे त्वचा व मांस ह्यांच्या ठिकाणी स्थानसंश्रय करुन उत्सेध लक्षण असेला शोथ निर्माण करतो. वरवर पाहता हे संप्राप्तींचे असे वर्णन खूपच ढोबळ वाटते त्यावरुन व्याधी प्रक्रियेचा काहीच अंदाज येत नाही. असे होते याचे कारण आपण हे वर्णन तुकड्या तुकड्याने म्हणजे वेगळे काढून स्वतंत्रपणे वाचतो, आयुर्वेदातले शारीर न लक्षात घेता वाचतो. व्याधी संकल्पना पूर्णपणे समजून घेऊन व आयुर्वेदीय शारीर लक्षात घेऊन ह्या संप्राप्तीकडे बघितलं तर शरीरात काय घडत असावे ह्याचा अचूक अंदाज येतो. शोथातला मुख्य लक्षात घेण्यासारखा भाग म्हणजे रस-रक्त संवहन ज्यामुळे घडते तो वायु (व्यान वायु) बिघडणे ही शोथातली मुख्य विकृती आहे आणि बहिः सिराः (बाह्य सिरा) म्हणजे शाखांमधील रक्तवाहिन्यां (Peripheral circulation)मध्ये वहन होत असलेले रक्त, पित्त व कफ दुष्ट झाल्यामुळे हा अडथळा निर्माण होतो व त्यामुळे वात बिघडतो आणि म्हणून शोथाची मुख्य संप्राप्ती घडते. लोहासव हा आसव स्वरुपातला हा कल्प असल्याने सूक्ष्मस्त्रोतोगामी होऊन वहनातील रक्त, पित्त व कफ ह्यांचा मार्गावरोध दूर करण्याचे काम करते. लोहासव हे रस-रक्त संवहनामध्ये म्हणजेच रस व रक्तवह स्रोतसांमध्ये कार्यरत असलेल्या धात्वाग्नि व्यापारात बिघाड झाल्यामुळे शोथ निर्माण होत असेल तर तो बिघाड दुरुस्त करण्याचे काम करते (आयुर्वेदातल्या स्त्रोतस् संकल्पनेनुसार **परिणामं आपद्यमान धातूंचे** म्हणजे रुपांतर होत असलेल्या धातूंचे अभिवहन स्रोतसे करतात ह्या स्रोतसांच्या व्याख्येनुसार हा तर्क मांडला आहे). ह्याचा व्यापक अर्थ लक्षात घेतला तर लोहासव हे Cellular level किंवा Tissue level वर होणारे Micro-Inflammation व

**बहुकल्पं बहुगुणं संपन्नं योग्यमौषधम्।**

Impaired Metabolism सुधारण्याचे काम करत असावे असा तर्क करता येतो. ह्या पार्श्वभूमीवर विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे लोहासवाच्या फलश्रुतीत ते हृद्रोगावर काम करते असे वर्णन आहे तो केवळ योगायोग नव्हे. Athero-Sclerosis या स्थितीवर (जी Micro Inflammation मुळे उत्पन्न होते असे नवे संशोधन सांगते) आणि त्यातून उद्भवणाऱ्या Coronary artery disease ह्यात रस धात्वाग्नि दुष्टी दूर करण्याचे कार्य झाल्यामुळे उपयोगी पडू शकते. नवायस लोह जर लोहासवाच्या अनुपानाने दिले तर अधिक परिणामकारक होईल असे दोन्ही कल्पांच्या फलश्रुतीच्या अध्ययनातून समजते.

लोहासवाच्या फलश्रुतीतल्या शोथ आणि इतर व्याधींचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की ह्यातील रक्तदुष्टी हे समानसूत्र आहे आणि ह्या व्याधींमधील संप्राप्तीतला रक्तप्रदोष नाहीसा करण्याचे काम लोहासव करत असावे.

शोथाच्या संप्राप्तीत रक्त हे दूष्य आहे तसे ते पाण्डु, कुष्ठ, गुल्म, प्लीहोदर, भगंदर ह्यांतही एक प्रमुख दूष्य आहे, चरकसंहितेतले रक्तप्रदोषज विकार बघितले तर लोहासवाच्या फलश्रुतीतील १४ लक्षणांपैकी ८ लक्षणे हे रक्तप्रदोषज विकार म्हणून वर्णन केलेले आहेत. त्यामुळे रक्तप्रदोष हे लोहासवाचे कार्यक्षेत्र आहे असे म्हणायला हरकत नाही.

| अनु. क्र | रक्तप्रदोषज विकार |
|---|---|
| १ | गुल्म |
| २ | वैवर्ण्यम् |
| ३ | अग्निसाद |
| ४ | अरुचिः |
| ५ | कुष्ठ |
| ६ | कण्डु |
| ७ | प्लीह |
| ८ | कामला |

शोथामध्ये दशमूळही काम करते, पुनर्नवा ही काम करते आणि आता आपण म्हणतोय की लोहासव, नवायस ही कार्य करते, मग कसं काम करते आणि या औषधांच्या शोथघ्न कार्यात काही वेगळेपणा आहे का असा स्वाभाविकच पुढचा प्रश्न येतो. दशमूळ हे वातशमनाचे कार्य करते तर पुनर्नवा रक्त, पित्त ह्यावर कार्य करते आणि म्हणून शोथ ह्या व्याधीत उपयुक्त ठरते. एखाद्या व्याधीच्या संप्राप्तीत अनेक स्तरावर बिघाड झालेला असतो आणि अनेक घटक निरनिराळ्या प्रकारे दुष्ट झालेले असतात, त्या व्याधीवरचे औषध हे त्या व्याधीच्या संप्राप्तीतला कोणता बिघाड कसा दुरुस्त करणार आहे याची नेमकी माहिती सांगता येणे म्हणजे त्या औषधाची Mode of Action समजणे. लोहासवाच्या आत्तापर्यंतच्या अध्ययनावरुन ते शोथ संप्राप्तीमधल्या रक्तप्रदोष नाहीसा करते असे म्हणता येईल, रसापासून रक्त बनण्याच्या धात्वाग्निच्या प्रक्रियेतील बिघाड दुरुस्त करुन लोहासव हे कार्य करते हे आपण मागे बघितले, त्यामुळे रक्ताचे एकुणच कार्य सुधारण्यासाठी लोहासव उपयुक्त ठरते. ह्या औषधाच्या फलश्रुतीतल्या यादीत वर्णन केलेल्या प्रत्येक व्याधीच्या संप्राप्तीतली रक्तदुष्टी, अग्नि, विशेषतः धात्वाग्नि स्तरावरची विकृती लोहासव नाहीशी करते असे नेमकेपणाने आपल्याला म्हणता येईल.

अग्निमांद्य,कण्डू, कुष्ठ, पाण्डु, अरोचक व शोथ हा लोहासवाचा रोग समूह व ह्यात स्थौल्य,प्रमेहपिडका, कामला हे नवायस रोग मधील रोग समूहातले व्याधी एकत्र केले तर हे आपल्याला आणखी एका ठिकाणी एकत्रपणे पाहायला मिळतात ते म्हणजे संतर्पणोत्थ विकारांच्या यादीमध्ये ! चरकसंहितेत सूत्रस्थानात संतर्पणीय अध्यायात अति संतर्पणामुळे होणाऱ्या रोगांमध्ये यांचा समावेश आहे.

**रोगास्तस्योपजायन्ते सन्तर्पणनिमित्तजाः।**
**प्रमेहपिडकाकोठकण्डूपाण्ड्वामयज्वराः।।५।।**
**कुष्ठान्यामप्रदोषाश्चमूत्रकृच्छ्रमरोचकः।**
**तन्द्रा क्लैब्यमतिस्थौल्यमालस्यं गुरुगात्रता।।६।।**
**इन्द्रियस्रोतसां लेपो बुद्धेर्मोहःप्रमीलकः।**
**शोफाश्चैवंविधाश्चान्ये शीघ्रमप्रतिकुर्वतः।।७।।**च.सू.२२

संतर्पणोत्थ विकारांपैकी बहुतांशी रोग लोहासवाच्या व नवायसाच्या फलश्रुतीत आढळतात याचा अर्थ लोहासव व नवायस लोह हे कल्प संतर्पणोत्थ विकारांमध्ये काम करण्याच्या अपेक्षेने रचले गेले आहेत. म्हणजे आणखी नेमकेपणाने सांगायचे झाल्यास लोहासव व नवायस लोह हे रक्त धातूची अतिसंतर्पणामुळे होणारी दुष्टी दूर करणारे औषध आहे असे म्हणता येईल.

लोहासवा सारखा म्हणजे त्याच वर्गातला अरिष्ट कल्प लोहारिष्ट सुश्रुतसंहितेत प्रमेहपिडका चिकित्सेत आलेला आहे. ह्या कल्पाची घटक द्रव्ये वेगळी आहेत पण फलश्रुतीतल्या रोगांची यादी बघितली तर त्यात शोफ,गुल्म,कुष्ठ, मेह, पाण्डु व प्लीहोदर तसेच विषम ज्वर असा म्हणजे लोहासवात वर्णन केलेल्या रोगसमूहाशी बहुतांशी साम्य असणारा आहे आणि यात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की हा कल्प कार्श्य म्हणजे

**नवायस लोह या औषधास लोहसवाचे अनुपान द्यावे.**

कृशता निर्माण करणारा आहे, मंद झालेला अग्नि प्रदीप्त करणारा तसेच **अभिष्यन्दापहरणो** म्हणजे शरीरातील अतिरिक्त क्लेद कमी करणारा आहे. डल्हणाने  ह्या अभिष्यन्द शब्दाचे स्पष्टीकरण देताना

**अत्राभिष्यन्दशब्देनमूत्रनिःस्यन्दोऽभिधीयते।।** १२-१९।।

असे म्हटले आहे. म्हणजे मूत्ररुपात बाहेर पडणारा क्लेद म्हणायचे आहे हे स्पष्टपणे म्हणले आहे. रोगसमूहात साम्य आहे तसेच कार्यपध्दतीतही नवायसाशी साम्य आहे.

**कार्श्यकृद्वलिनामेष सन्नस्याग्नेःप्रसाधकः ।**
**शोफनुद्गुल्महृत्कुष्ठमेहपाण्ड्वामयापहः।।१८।।**
**प्लीहोदरहरःशीघ्रं विषमज्वरनाशनः ।**
**अभिष्यन्दापहरणो लोहारिष्टो महागुणः।।१९।।** सु.चि. १२

यावरुन असे म्हणता येईल की लोहाचा द्रव स्वरुपातला कल्प हा अपतर्पण करण्याचे कार्य करतो.

पाण्डु विकाराचे दोन प्रकारचे रुग्ण आपल्याला व्यवसायात बघायला मिळतात. मोल मजूरी करणारे रुग्ण व सुखवस्तु घरातील रुग्ण, ह्या दोन्ही प्रकारात पाण्डु आढळतो. त्यामुळे शहरीभागातल्या रुग्णांना होणाऱ्या सुखवस्तु घरांमधील रुग्णांमध्ये आढळणाऱ्या पाण्डुत हे अधिक उपयोगी पडतील. हे नेमकेपणाने समजल्याने संप्राप्तीतल्या साधर्म्यामुळे व कार्य करण्याच्या पध्दतीमुळे हृद्रोगातले रस धात्वाग्नि दुष्टी नाहीशी करण्याचे कार्य लोहासव करते ह्या म्हणण्याला अधिक पुष्टी मिळते. लोहासव रक्ताबरोबरच रसधातूवरही काम करते म्हणून पाण्डु व हृद्रोग ह्यावर काम करते. कारण हृद्रोगाच्या संप्राप्तीत रसदुष्टी ही प्रमुख घटना आहे.

**दूषयित्वा रसं दोषाः विगुणा हृदयं गताः । हृदि बाधां प्रकुर्वन्ति हृद्रोगं तं प्रचक्षते ।।**

लोहासव हे पाण्डु व कुष्ठ ह्या व्याधींमध्ये काम करते असे वर्णन आहे म्हणजे ते शरीर शैथिल्य ह्या भावावर काम करत असावे कारण शैथिल्य ही ह्या दोन्ही व्याधींच्या संप्राप्ती मधली समान घटना आहे आणि अतिरिक्त क्लेदामुळे शरीरात शैथिल्य निर्माण होते व अतिरिक्त क्लेदावर जे औषध काम करेल ते शैथिल्यावरही करेल हे तर्कसुसंगतच आहे. लोहासव हे रक्तगामी औषध असल्याने रक्तातील शैथिल्य कमी करते आणि ह्याच गुणधर्मामुळे ते पाण्डुरोग व कुष्ठ ह्या विकारांच्या संप्राप्तीतील मुख्य घटनेवर काम करते.

फलश्रुतीतल्या पहिल्याच ओळीत लोहासव हे अग्निवृध्दिकर आहे अस वर्णनआहे, हा गुणधर्म आहे म्हणून ते गुल्म, अर्श, उदर व ग्रहणी, अरोचक ह्या रोग समूहावर काम करते कारण अग्निमांद्य ही ह्या व्याधींमधील मुख्य विकृतीअसते. गुल्मावर कोणतेही औषध काम करणार असेल तर त्या औषधाला वाताच्या रुक्ष ह्या गुणावर काम करावे लागेल याबाबतीत लोहासवाचा सूक्ष्म स्रोतोगामी व वातानुलोमन करणारा गुण कामी येतो. ह्याच वातानुलोमन करण्याच्या आसव-कल्पाच्या गुणधर्मामुळे अर्शामधली रुजा कमी होत असावी कारण कोणताही शूल हा वायु विगुण झाल्यानेच होतो असा आयुर्वेदाचा सिध्दांत आहे. शोथ नाहीसा करणे व विगुण झालेल्या वायुचे अनुलोमन करणे ह्या दोन्ही गुणधर्मांमुळे हे रुजा नाहीशी करण्याचे काम होत असावे. अर्शामध्ये रुजा असणे ह्या अवस्था विशेषात लोहासव उपयोगी पडते असे अधिक तपशीलवार वर्णन येथे आढळते. लाक्षणिक चिकित्से साठी  आयुर्वेदात फार कमी कल्प बघायला मिळतात, लोहासव हा असा एक लाक्षणिक उपशय देणारा कल्प आहे. अर्शातील रुजा ह्या लक्षणानंतर कण्डू ह्या लक्षणाचा समावेश फलश्रुतीतल्या यादीत आहे. ह्याच धर्तीवर कण्डू ह्या लक्षणाकडे ही बघितले पाहिजे अर्शातली रुजा तसेच त्वचा विकारांतले कण्डू ह्या लक्षणाचा ही उल्लेख येथे आहे. येथे रक्तप्रदोष ह्यावर विशेषत्वाने काम होत असल्याने कण्डूघ्न कार्य घडत असावे. ह्या कण्डूच्या जोडीला कुष्ठाचे वर्णन आहे. लोहासव हे कास श्वासावर काम करते ते ही लाक्षणिक कास-श्वासावर असावे असे वाटते विशेषतः पाण्डुरोगामुळे निर्माण होणाऱ्या श्वासात व कासात काम करणारे हे औषध असावे.

मागे बघितल्या प्रमाणे अतिसंतर्पणामुळे निर्माण होणाऱ्या रक्तदुष्टीच्या अवस्थेत लोहासव उपयोगी पडते आणि शैथिल्य कमी करणारे आहे या तर्काशी सुसंगत कार्य लोहासवाचे दिसते ते म्हणजे शरीरातील क्लेदाची दुष्टी कमी करण्याचे म्हणून त्याच्या फलश्रुतीत भगंदर, कास व श्वास ह्यांत उपयोगी पडते असा उल्लेख आढळतो.भगन्दरामध्ये मांस व शोणित यांची दुष्टी होते असे संप्राप्तीत वर्णन आहे म्हणजे येथेही रक्तप्रदोष नाहीसा करण्याचे व क्लेद तसेच मांसप्रदोष कमी करण्याचे काम हे दोन्ही कल्प करतात असे म्हणायला वाव आहे, कारण ज्या अर्थी प्रमेहपिडका वर हे कल्प काम करतात त्याअर्थी ते मांसप्रदोषा वर काम करतात हे नक्की. कारण प्रमेहात मांसप्रदोष निर्माण झाल्यावरच प्रमेह पिडका होतात असे स्पष्ट वर्णन आहे.

हृदय, प्लीहा ह्या अवयवांचा उल्लेख लोहासवाच्या फलश्रुतीत आहे, प्लीहेवर काम करते म्हणजे यकृतावरही काम करते हे ओघाने आलेच आणि हे तीनही अवयव रक्ताशी साक्षात संबंध असणारे आहेत म्हणून या अवयवांवर लोहासव काम करते. थोडक्यात सांगायचे झाल्यास रक्त धातुची दुष्टी, शैथिल्य,

**पांडुजन्य श्वासकासात लोहासव उपयुक्त आहे.**

रक्तधात्वाग्नि मार्फत इतर धात्वाग्नि ह्यावर अपतर्पण जातीचे काम करणारे वर्ण, बल व ओज वाढविणारे हे औषध आहे हे लक्षांत घ्यायला हवे. लोहासवाच्या कार्याची व्याप्ती विस्तृत आहे. ती जाणून घेतली तर लोहासव हे चिकित्सेतले एक महत्त्वपूर्ण औषध ठरु शकते हे जाणवेल.

**वैद्य अभय कुलकर्णी एम.डी (आयुर्वेद)**
**वैद्य सौ. राजश्री कुलकर्णी एम.डी (आयुर्वेद)**
आयुःश्री आयुर्वेदीय हॉस्पिटल व रिसर्च सेंटर
३४, परब नगर, स्वामी समर्थ केंद्राजवळ,
इंदिरानगर, नाशिक ४२२००९
फोन ९८२२५३७२४०

## आयुर्वेद पत्रिका जाहिरात दरपत्रक

| जाहिरातीचा प्रकार | जाहिरात दर | |
|---|---|---|
| | १ अंक | १२ अंक |
| **अ. ब्लॅक अॅण्ड व्हाईट** | | |
| १. आतील पूर्ण पान | २००० | २०,००० |
| २. आतील अर्धे पान | १२०० | १२,००० |
| ३. आतील पाव पान | ६५० | ६,५०० |
| **ब. रंगीत जाहिरात** | | |
| १. मुखपृष्ठ क्रमांक २ | ६००० | ६०,००० |
| २. मलपृष्ठ क्रमांक ३ | ६००० | ६०,००० |
| ३. आतील पूर्ण पान | ५००० | ५०,००० |
| ४. मध्यवर्ती पूर्ण पान | ६००० | ६०,००० |
| ५. मध्यवर्ती २ पूर्ण पान | ११००० | १,१०,००० |

**(पान क्र. ३८ पासून पुढे)**

7)Dr YadaiahP ,Author,Textbok of clinical Panchkarma.1 sted.Akola:Jayaprakashan :2000.pg.no.102.8) NidhiGupta, Manish Agrawalauthors, Swasthvrutta Vidnyan chapter 12 Asnas,, first ed, ,Varanasi: Chaukhambha Prakashak; 2019.p.145) 9) Swami Karmananda author yogic management of common diseases,Gastro intestinal tract,the problem of obesity,Munger Bihar :Yoga publications street;Reprint 2005,p. 137. 10) The Charaksamhita of Agnivesha revised by charaka and drudhbalahindi commentary by K.shastri .G.chatyrvedi edited by R S ahstriY.Upadhyaya et al ,Sutrasthana 21/20,16th ed. Varanasi: Chaukhambhabharati Academy;1989. p.414 11)AgniveshasCharaksamhita text with English translation based on Chakrapani data s AyurvedDipika edited by R.K.Sharma ,vd. Bhagwan dash vol.2,Vimansthana chapter 3/40,Varanasi,chaukhambha sanskrut series office ,reprint 2018.p.156-157. 12) SushrutSamhita of Sushrutacharya with the Nibandhsangrah commentary by ShriDalhanacharya edited by vd. Jadhavji Trikamjin Acharya and Narayan ram Aacharya, Uttartantra 15/32.5th revised ed.. Varanasi. Chaukhambha orientalia;1992. p.73. 13)The Charaksamhita of Agnivesha revised by Charaka and Drudhbala English commentary by R K.Sharma.,VdBhagwan Dash,vol.2 ,Vimansthana 3/40,Reprint 2018.Varanasi:Chaukhambha bharati Academy;2018.p.156-157.14)World Health Organization, The global burden ofdiseases,Part 2,causes of death.Geneva, Switzerland: WHO;2008.P.8-10. 15)World Health Organization, Waist circumference and waist hip ratio, Report of a WHO Expert Consultation, Geneva, 8-11 dec.2008.:WHO;2008.P.19. 16) Swami Karmananda author Yogic management of common diseases, Gastro intestinal tract,the problem of Obesity, Munger Bihar :Yoga publications street;Reprint2005,p.136.

**Dr.SeemaNaringe**
Associate Professor,Swasthvrutta,
C.G.Ayurvedic Medical College Rajnandgaon.
**Dr.ShubhangiDighade**
Professor (Kayachikitsa )
SST Ayurved & Hospital,
Sangamner,Ahamadnagar